Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308


# B.Aadhar

Peer-Reviewed Indexed
Multidisciplinary International Research Journal

October -2020

SPECIAL ISSUE NO - CCXLVII ( 247)

# Ideology of Mahatma Gandhi



Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director

Guest Editor
Dr. R.K.Ippar
Principal

Executive Editor
Dr. B.K. Shep,
Head, Dept. of History

Executive Editor
Dr. R.D. Rathod,
Head, Dept. of Sociology

Executive Editor
Prof.(Dr.) V.B. Gaikwad ,
P.G. Coordinator, Science

Jawahar Education Society's
Vaidyanath College Parli- Vaijnath, Dist. Beed.

Scanned with OKEN Scanner

Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed Indexed

Multidisciplinary International Research Journal

October - 2020

ISSUE No - CCXLVII ( 247)

# Ideology of Mahatma Gandhi

Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director

Guest Editor
Dr. R.K.Ippar
Principal

Executive Editor
Dr. B.K. Shep,
Head, Dept. of History

Executive Editor
Dr. R.D. Rathod,
Head, Dept. of Sociology

Executive Editor
Prof.(Dr.) V.B. Gaikwad ,
P.G. Coordinator, Science

Jawahar Education Society's

Vaidyanath College Parli- Vaijnath,Dist. Beed.

This Journal is indexed in :

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmo S Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

Aadhar International Publication

For Details Visit To : www.aadharsocial.com

© All rights reserved with the authors & publisher

Assistant Professor
Lokmanya Mahavidyalaya, Warora
Dist. Chandrapur

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ((SJIF) -7.675, Issue NO, 247
ISSN : 2278-9308
October,2020


| | | |
|---|---|---|
| 41 | महात्मा गांधींचे स्त्रियांविषयीचा मानवतावादी दृष्टीकोन<br>डॉ. जयश्री महाजन /कांचन हिलाल देसले | 158 |
| 42 | महात्मा गांधी आणि अस्पृश्यता प्रा. कांबळे शिवरजी ईरबा | 162 |
| 43 | महात्मा गांधीचे शैक्षणिक विचार डॉ. मा.धो.कच्छवे | 165 |
| 44 | Role Of Women In Mahatma Gandhi S Freedom Movement<br>डॉ. के.के. आहुजा | 168 |
| 45 | म. गांधी यांची सत्याग्रहाविषयी भूमिका प्रा. डॉ. गोविंद काळे | 170 |
| 46 | असहकार चळवळीत महात्मा गांधींची भूमिका<br>प्रा.डॉ. मोकाटे नाथा रामभाऊ | 173 |
| 47 | गाँधी और मानव अधिकार डॉ. प्रिया सोनी खरे | 177 |
| 48 | महात्मा गांधीजींचे महिला सक्षमीकरणातील योगदान<br>प्रा.डॉ.काशिलिंग रघुनाथ गावडे | 179 |
| 49 | महात्मा गांधीजींची विचारधारा राइसे दिनेश टेट्या | 184 |
| 50 | महात्मा गांधीचे ग्रामोद्योगा विषयी विचार व कार्य<br>प्रा.डॉ. दीपक पां. लोणकर | 191 |
| 51 | गांधीजींचे जीवन शिक्षण प्रा. डॉ. भुजंग पाटील | 196 |
| 52 | गांधीजींचे शैक्षणिक धोरण प्रा. डॉ. भास्कर माने | 199 |
| 53 | महात्मा गांधी कालीन पत्रकारिता डॉ.भालचंद्र गोविंदराव कुलकर्णी | 202 |
| 54 | महात्मा गांधी यांचे आर्थिक विचार प्रा.डॉ. बी. आर. शिंदे | 206 |
| 55 | महात्मा गांधींचे ग्रामस्वराज्या संदर्भातील विचार<br>डॉ.देवर्षा मुंकंद अरविंद डॉ.बाळासाहेब वि.मुंडे | 209 |
| 56 | महात्मा गांधीजींची वर्धा शिक्षण योजना (१९३७) व शैक्षणिक राष्ट्रीय धोरण २०२० : एक अभ्यास श्री. अजितकुमार भिमराव पाटील | 212 |
| 57 | भगवद्गीता व महात्मा गांधी प्रा.डॉ.जाधवर बापू देवराव | 220 |
| 58 | ऑनलाइन शिक्षा वर्तमान संकट की वैकल्पिक व्यवस्था डॉ. रीना गुप्ता | 222 |
| 59 | महात्मा गांधींची आर्थिक विकेंद्रिकरणाची संकल्पना आणि आजची परिस्थिती कु. लीना ना. पुप्पलवार | 227 |


Assistant Professor
Lokmanya Mahavidyalaya, W
Dist. Chandrapur



Scanned with OKEN Scanner

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal | ISSN : 2278-9308
Impact Factor - ((SJIF) -7.675, Issue NO, 247 | October,2020

# महात्मा गांधीचे ग्रामोद्योगाविषयी विचार व कार्य

प्रा.डॉ. दीपक पां. लोणकर
लोकमान्य महाविद्यालय, वरोरा जि. चंद्रपूर (महा.), पिन. ४४२६०७

प्रस्तावना-

प्राचीन काळापासून भारतात स्वयंपूर्ण अशी ग्रामीण अर्थव्यवस्था असुन गावातील व्यवहार गावतच पूर्ण केले जात होते. गावातील न्यायनिवाडे, तंटे गावातच सोडविले जात होते. त्यासाठी गावात एक पंचायत राहत असून त्यात गावातील प्रतिष्ठीत, वयोवृध्द व अनुभवी व्यक्ती राहत व त्यांच्या सल्ल्याने गावाचा कारभार व न्यायनिवाडा केला जात असे. मध्ययुगीन काळातही ही पंचायतीची व्यवस्था कायम असुन गावे स्वयंपूर्ण होती. परंतु ब्रिटीशांच्या आगमनानंतर त्याच्या आर्थिक धोरणामुळे ही व्यवस्था हळूहळू बदलत गेली. औद्योगीकरण झपाट्याने घडून आले. भारतातील नैसर्गिक साधन संपत्तीचा व कच्चा मालाचा मोठ्या प्रमाणात वापर करू लागले. यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था उध्वस्त होऊन मोठे उद्योगधंदे व कारखाने तयार झाले. गावातील स्वयंपूर्णता नष्ट घेऊन कारागिर बेकार झाले व ते शहरात या कारखान्यामध्ये काम करू लागल्यामुळे गावातील, कुटीर उद्योग बंद होऊन बेकारी वाढली. व गावाची स्वयंपुर्णता लोप पावू लागली. त्यामुळे गावात अनेक समस्या निर्माण झाल्या.

अशा परीस्थितीत गावात मोजकेच उद्योग शिल्लक राहिले. याच काळात म. गांधी यांचा भारतीय राजकारणात प्रवेश घेऊन त्यांनी स्वातंत्र्य मिळवून देण्याबरोबरच मोडकळीस आलेल्या ग्रामीण अर्थव्यवस्थेला ग्रामोद्योगाच्या माध्यमातून पुनरूज्जीवीत करण्याचा प्रयत्न केला व गावातील बेकारी दूर करून गावाला पूर्ण स्वयंपूर्णतेकडे नेण्याचा प्रयत्न केला यातूनच त्यांनी 'खेड्याकडे चला' असा नाराही दिला तसेच कांग्रेसच्या राष्ट्रीय कार्यक्रमात ग्रामोद्योगांला महत्व देऊन त्या दृष्टीने मं. गांधीनी ग्रामोध्दाराचे कार्य केले त्यामुळे पुढे ग्रामोद्योग ही चळवळ बनली. त्यांनी ग्रामोध्दार स्वयपूर्णतेसाठी ग्रामोद्योग संघ ही कल्पना मांडली व तिची अंमलाषाहाणीही केली.

ग्रामोद्योग संघाची स्थापना -

महात्मा गांधीनी अस्पृशता निवारण हा कार्यक्रम हाती घेतल्यामुळे ते 'हरिजन कोष' साठी मालाबन च्या यात्रेवर असतांना गावातील बेकारी व गरीबी दूर करण्यासाठी खादी व्यक्तिरीक्त एखादी दुसरी संघटना असावी असा विचार त्यांच्या मनात आला.[१] या संदर्भात विचार करून त्यांनी डिसेंबर १९३३ च्या वर्धा येथील गांधीसेवा संघाच्या बैठकीत ग्रामोद्योग संघ स्थापन करण्याबाबत आपले विचार व्यक्त केले. तेव्हा ते म्हणतात, 'ज्यावेळी शहरातील नागरीक हे गावातील बनलेले वस्तू वापण्याचा संकल्प करतील त्याचक्षणी गावातील ग्रामवासी व शहरवासी यांच्यातील तुटलेले संबंध पुन्हा जोडेल व मृतपाय ग्रामोद्योगाला यामुळे संजीवनी मिळेल ..."[२] असे सांगून कार्यकर्त्याने गावात जाऊन सूची बनवून वर्गीकरण करावे व खाण्याच्या व कपड्याच्या संदर्भातील गोष्टीना महत्व द्यावे असे आदेशही दिले.[३] या दृष्टीने अमंलबजावणी करण्यासाठी १४ डिसेंबर १९३४ रोजी वर्धा येथे अखिल भारतीय ग्रामोद्योग संघाची स्थापना केली.[४] व डिसेंबर १९३४ च्या मुंबई येथील अखिल भारतीय कांग्रेसच्या अधिवेशतात अखिल भारतीय ग्रामोद्योगसंघाच्या स्थापनेचा प्रस्ताव ठेऊन काग्रेसच्या राष्ट्रीय कार्यक्रमात ग्रामोद्योगाला मान्यता ही मिळवून घेतली.[५] या संदर्भात मं. गांधी म्हणतात ".. . हा संघ कातणे या मुख्य उद्योगा बरोबरच मृतपाय ग्रामीण उद्योगाला पुनरूज्जीवन व प्रोत्साहन देण्याचे कार्य करेल तसेच गावाची नैतीक व शारीरीक प्रगती साठी कार्य करेल".[६]

कार्यकारीणी व सदस्य प्रतिज्ञा -

१९३४ मध्ये अखिल भारतीय ग्रामोद्योग संघाची स्थापना होऊन त्याची कार्यकारीणीही घोषीत करण्यात आली. त्यात कृष्णदास जाजू हे अध्यक्ष व कोषाध्यक्ष म्हणून तर कुमारप्पा हे संचालक व मंत्री म्हणून नियुक्ती केल्या गेली. याशिवाय गोशी बहन, डॉ. खान साहेब, शुरजीबल्लभ दास, प्रफुलचंद्र घोष, लक्ष्मीदास, पुरूषोत्तम दास आसर व शंकरलाल बेकर हे सदस्य म्हणून नियुक्त केल्या गेले.[७] तसेच एक सल्लागार मंडळ ही तयार करण्यात येऊन त्यात



Assistant Professor

भारतातील प्रतिष्ठीत व्यापारी, डॉक्टर व वैज्ञानिक यांचाही समावेश करण्यात आला. विशेषता या सल्लागार मंडळात रविंद्रनाथ टागोर यांचे सुध्दा नाव समाविष्ट होते.[८]

तसेच कृष्णदास जाजू, कुमारप्पा, डॉ. गोपीचंद्र, जमनालाल बजाज, वैकुष्ठ मेहता, डॉ. खान साहेब या सहा जणांचे एक संरक्षक मंडळही तयार करण्यात येऊन त्यांची निवड ही आजीवन होती.[९] या सरक्षक मंडळाच्या कर्तव्याबद्दल म. गांधी म्हणतात, 'सरक्षक मंडळ हे केवळ खजिनाचे रक्षक नाहीतर जो आदर्श समोर ठेवला आहे. त्याचेही रक्षक आहे ... संघ च्या संरक्षकाची जबाबदारी ही मोठी आहे ... सरक्षकानी आदर्श जनतेच्या जीवनात प्रवेश करणेच त्यांची सार्थकता ठरेल ..."[१०].

ग्रामोद्योग संघाचे सदस्य होणाऱ्यांना एक प्रतिज्ञापत्र भरून त्यावर सही करावी लागत असे त्यात सदस्य असे पर्यंत सविनय भंगाच्या कोणत्याही लढाई भाग न घेणे व व्यक्ति व्यक्तिमध्ये कुठलाही भेदभाव न ठेवता ग्रामवासियाप्रती आपला धर्मपालन करण्याची शपथ घ्यावी लागत.[११]

ग्रामोद्योग म्हणजे काय ?

यासाठी काही निकष ठरविण्यात आले आहे.

(१) गावासाठी आवश्यक वस्तूचे उत्पादन गावकरी करतील.
(२) उत्पादन साधनेही गावाच्याच शेजारी (जवळ) असतील.
(३) असे औजार व यंत्रे कामी आणल्या जाईल जे गावाला आर्थिक दृष्ट्या परवडनारे असतील.
(४) ज्यामध्ये स्थानिक कच्च्या मालाचा उपयोग केला जाईल.
(५) ज्यांचा माल स्थानिक व जवळच्या बाजारात विकला जात असेल.
(६) ज्यामुळे कामगारात बेकारी वाढणार नाही.
(७) जे व्यवसाय मनुष्य व प्राण्याद्वारा चालू शकत होते.[१२]

हे निकष ज्या उद्योगाला लागू होईल तो उद्योग ग्रामोद्योग ठरविला जात असे उदा. - तेलघानी, कापड, विणकाम, चामडे कमविणे, शिवणकाम, लोहार, सुतार इत्यादी उद्योग या निकषात येत असे.

(१) या व्यतिरिक्त खाद्य पदार्थ व भोजन व्यवस्था च्या उपयोगात येणारे उद्योग उदा. - दळण दळणे, धान्य काडणे, तेल काढणे, गुळ बनविणे इत्यादी.

(२) या व्यतिरीक्त इतर व्यवसाय जे शेती संदर्भात होते उदा. - मधूमक्षिका पालन, रेशम चे किडे पालन, लाख ची शेती इत्यादी.

(३) याव्यतिरीक्त इतर व्यवसाय जे विशिष्ट लोकांचे होत. देशात फक्त तेच करू शकत होते. उदा. - चामडे तयार करणे, कागद बनविणे, दोर विणणे, टोपली बनविणे, कुंभार, सुतार, लोहार इत्यादी व्यवसाय त्यात प्रमुख होत.[१३] अशा प्रकारे व्यवसायाचे वर्गीकरण करण्यात येऊन त्यांना ग्रामोद्योगात समाविष्ट करण्यात आले होते.

अखिल भारतीय ग्रामोद्योग संघाच्या माध्यमातूनही वेगवेगळे कार्यक्रम राबविल्या गेले त्यात हात कुटाईचे तांदुळ, हाताने दळलेले अन्न, उसाचा रसापासुन तयार केलेला गुळ, घाणीचे तेल इत्यादी प्रांरभिक कार्यक्रम तयार केल्या गेले.[१४] विशेषता ग्रामोद्योच्या मागे आर्थिक दृष्टीबरोबरच आरोग्यविषयक दृष्टीही ठेवल्या जाऊन वैज्ञानिक दृष्टीकोन ठेवण्यासाठी वैज्ञानिक व डाक्टरांचाही सल्ला घेतल्या जात असे.[१५] तसेच आहाराच्या संबंधीत विशिष्ट पदार्थाचे काय महत्व आहे यासंबंधी माहिती दिल्या जात होती. या ग्रामोद्योगासबंधी महात्मा गांधी म्हणतात, "या योजनेमुळे करोडो लोकांना आपल्या उत्पन्नात भर घालता येईल व आपला निर्वाह चालविता येईल. त्यासाठी त्यांना बेकारीच्या शिक्षेवर अवलंबून राहावे लागणार नाही किंवा स्वाभिमान गमवावा लागणार नाही ही सामाजीक विमा योजना हिंदी संस्कृतीला धरून आहे ..."[१६]

ग्रामोद्योगासाठी प्रदर्शनी -

महात्मा गांधीनी ग्रामोद्योगला महत्व देतांना खादी व ग्रामोध्योग हे स्वतंत्र आंदोलनाचे भाग मानले व याद्वारे भारतातील ७ लाख खेड्यातील लोकांना याद्वारे पोटभर अन्नमिळेल असा त्यांचा विश्वास होता.[१७] म्हणून काग्रेसची वार्षिक अधिवेशने शहरात न घेता गावात घ्यावी ज्यामुळे शहरातील लोकांचा गावाशी संपर्क येईल व गावकरी ही राष्ट्रीय संघटनेच्या कामात आपला सहभाग घेऊ शकेल.[१८] त्यामुळे काग्रेसचे फैजपूर व हरीपुरा (गुजरात) ही अधिवेशने गावात घेतल्या गेली. फैजपूर अधिवेशान मं. गांधीच्या आग्रहावरून खादी ग्रामोद्योग प्रदर्शनी शांतीनिकेतनचे प्रसिध्द कलाकार श्री.

नंदलाल बसू यांच्या नेतृत्वात लावण्यात येऊन त्याला लोकमान्य तिलक नगर असे नामकरण करण्यात आले.[१८] तसेच हरीपुरा (गुजरात) येथे ही तशीच प्रदर्शनीलावून त्यांचे उद्घाटन मं. गांधी यांनी केले.[१९]

म. गांधीनी ग्रामोद्योगाला भारतीय संस्कृतीचा पाया मानला. आर्थिक समानता निर्माण होण्यासाठी ग्रामोद्योग वाढले पाहिजे असा म. गांधीचा आग्रह होता.[२०] म्हणून त्यांना स्वदेशी चळवळीचा ग्रामोद्योगाच्या संघटनेचे स्वरूप दिले तसेच शेतकरी व छोटे उद्योगधंदे करणाऱ्यांची उन्नती करणे हे ग्रामोद्योगाचे ध्येय मानले.[२१] त्या दृष्टीने विधायक कार्यास प्रोत्साहन देऊन खेड्यातली सफाई, दारूबंदी, जातीय ऐक्य, अस्पृशता निवारण,राष्ट्रभाषा, मूलोद्योगीकरण, प्रौढ शिक्षण, स्त्री आदिवासी व महारोग्याची सेवा हे विधायक कार्य चालविण्यासाठी चरखा संघ, तालीमी संघ, हरीजन सेवक संघ, गोसेवा व ग्रामोद्योग संघ या स्वायत्त संस्थाना सलग्नीत करून घ्यावे असा ही उपाय त्यांनी सुचविला.

ग्रामोद्योगासाठी यंत्रविरोध

ग्रामोद्योगाच्या दृष्टीने मं. गांधीनी यंत्राच्या मोठ्या प्रमाणावरील वापराला व उपयोगाला विरोध केलेला दिसतो परंतु त्याचा यंत्राला विरोध नव्हता काही वेळा ग्रामोद्योगावर भागणार नसेल तर मोठ्या प्रमाणावर अवघड यंत्रसामुग्रीनिशी मोठे कारखाने उभे करावे लागतील हे गांधीजीना मान्य होते.[२२] परंतु यंत्रसामुग्रीतून आलेली कृत्रिमतेवर मात करण्यासाठी परत निसर्गाकडे वळण्याचाही त्यांनी सल्ला दिला व माणसाने आपल्या गरजा मर्यादित ठेवण्याची आवश्यकता त्यांनी प्रतिपादीत केली. पाश्चात्य आधुनिक यंत्राधिष्ठीत पाश्चात्य संस्कृतीमुळे भौतीक सुखाची नविन साधने उपलब्ध होऊन शारीरिक व मानसिक अधःपतन घडून येते अशी टीकाही केली.[१६] व यंत्राला आधुनिक सुधारणेची निशाणी मानुन त्याला महापाप मानले[२३].

ग्रामोद्योगासंबंधी विचार करतांना मं. गांधी हिदुस्थानमध्ये कापड गिरण्या काढण्यास विरोध दर्शवितात. त्यापेक्षा मँचेस्टरला पैसे पाठवून तेथील रद्दी कापड आनून भारतात वापरण्यास ते परवानगी देतात.[२४] स्वदेशीचा पुरस्कार करून आपल्याच शेतात पिकविलेल्या कापसाची वात बनवून दिवे लावले तर आपल्या डोळ्यांचे रक्षण होऊन पैसा वाचेल व आपणही स्वदेशी राहू असा मार्ग हीते सांगतात.[२५] खुल्या व्यापारामुळे भारतातील ग्रामोद्योगाचा ऱ्हास होऊन शेतकरी धुळीस मिळाला आहे म्हणून ते खुल्या व्यापारामध्ये विरोध करतात. पुढे ते म्हणतात कि, "भारतासारख्या प्रचंड लोकसंख्येच्या देशाने अद्यावत यंत्रसामुग्रीची कास धरण्यास सर्वाना रोजगार पुरवता येईल पण भांडवलसंचय त्यांना कधीच करता येणार नाही. म्हणून रोजगाराच्या दृष्टीने ग्रामोद्योगाचीच कास धरली पाहिजे[२६] असे महात्मा गांधी म्हणतात. मोठ्या प्रमाणातील यांत्रिकीकरणामुळे बेकारीची समस्या वाढेल व खेड्याच्या स्वयंपुर्णतेवर त्याचा परीणाम होईल असे त्यांचे मत होते.[२७] कामगाराची वर्गकलाची कल्पना त्यांना मान्य नव्हती. कामगारांना योग्य मोबदला मिळावा यासाठी ते आग्रही होते. कामगारांनी हिंसक मार्गाचा अवलंब करणे त्यांना मान्य नव्हते तर कामगाराच्या संपाला ते परवानगीही देतात.[२८] तसेच उद्योगपती व कारखानदारांनी स्वतःला मालक न समजता विश्वस्त समजावे व कामगारांचे हित लक्षात घेऊन जनकल्याणासाठी चालवावे असे ते म्हणतात.[२६]

कापड उद्योगास प्राधान्य (खादीस प्राधान्य)

ग्रामोद्योगासाठी त्यांनी शेतीबरोबरच कापड उद्योगासही प्राधान्य दिले व शेतीबरोबरच कापड उद्योगही करू शकतो असे त्यांना वाटत व यासाठी ते खादीचा पुरस्कार करून चरखा संघाला यासाठी महत्वपूर्ण मानतात व भारतीय ग्रामोद्योगाना पुनरूजीवीत करण्यासाठी भारतीय चरखा संघ ही स्थापन केला.[३०] भारतीय शेतकऱ्यांना पावसाची पुरेशी सोय नसल्यामुळे शेतीचा पावसाळी हंगाम संपला की इतर वेळात काम राहत नसे म्हणून बेकारीच हे भारतीयांच्या दारीद्रयाचे कारण आहे असे ते मानत म्हणून शेतकऱ्याने रिकाम्या वेळात चरखा चालवावा असा सल्ला ते देतात.[३१] त्यामुळे सूतकताई व विणाई यातून रोजगार उपलब्ध होऊ शकतो म्हणून त्यांनी चरख्याला ग्रामोद्योगाचा केंद्र बिंदू मानले व त्याच्याभोवती कागद, साबन, तेल इतर उद्योगाची गुंफन केली व खादीसारख्या सुलभ स्वस्त व लवचिक उद्योग त्यांनी शोधून काढला व त्यासाठी खादी मंडळही स्थापन केले. चरख्या संदर्भात महात्मा गांधी म्हणतात. "अहिंसक समाजातील अहिंसेच प्रतिक म्हणजे चरखा अशी त्यांनी चरख्याची व्याख्या केली आहे... कित्येक शतकापासून जो चरखा आपल्या दारिद्रयाची असहायतेची व परवशतेची खूण म्हणून ओळखला जात होता तोच चरखा आज आपल्या राजकीय, आर्थिक व सामाजिक स्वातंत्र्याकांक्षेचे प्रतिक बनला आहे. त्याचे पुनरूज्जीवन करणे म्हणजे शतकानुशतके केलेली चूक निस्तरणे होय

..."[२२] पुढे खादी बद्दल ते म्हणतात "... खेड्याचे शोषण करणे हा खादीचा उद्देश नव्हता तर खेड्यातून शहराकडे जाणारा संपत्तीचा ओघ उलटविणे हा प्रथम पासूनच खादीचा उद्देष आहे ..."[२३]

गृहउद्योग -

गृहउद्योग असा उद्योग आहे की जिथे कामगाराला आपल्या घरीच बसून हा व्यवसाय करता येतो. या उद्योगासाठी विशेष असे सुसज्जीत कारखाने आवश्यक नाही तर ते घरीच चालवू शकतात. उदा. - सोनार, चांभार, शिपी, विणकाम, फळ रक्षण, काशीदा काढणे, मधुमक्षिका पालन, छपाई, रंगाई, धातु काम इत्यादी उद्योग हे गृहउद्योगात येत असे. म्हणून त्यांनी ग्रामोद्योगात हस्त उद्योगाला प्रोत्साहन दिले. याबाबत ते म्हणतात "हस्तव्यवसायाला पुरेसे उत्पादन होऊ लागले ब्रिटीश मालाची गरज भासेनाशी झाली तर ते करीत असलेली आपली पिळवणूक थांबवून उलट त्यांनाच आर्थिक कोंडीत पकडता येईल व यंत्राच्या जोरावर होणारे प्रचंड उत्पादन निरर्थक करता येईल"[२४]

मूल्यमापन -

आजच्या यंत्र युगाच्या काळात ग्रामीण अर्थव्यवस्थेला मजबुती देण्यसाठी ग्रामोद्योगाचा पुरस्कार करणारे व ग्रमीण अर्थव्यवस्थेचे पुनरूजीवन करणारे प्रथम व्यक्ती म्हणून महात्मा गांधी यांचे नाव घेतले जाते. या दृष्टीने त्यांनी श्रीमंत व गरीब यांची दरी कमी करून आर्थिक समानता प्रस्थापीत करण्याचा ग्रामोद्योगाच्या माध्यमातून प्रयत्न केला. ग्रामोद्योगाला राष्ट्रीय महत्व प्राप्त करून देण्यासाठी त्याला काग्रेसची राष्ट्रीय कार्यक्रमातही सहभाग करून घेतला व ग्रामोद्योग हे मुख्य उद्दीष्ट समोर ठेऊन ग्रामीण अर्थव्यवस्थेला मजबूती आणण्यासाठी पुढे देश स्वतंत्र्य झाल्यावरही पंडित नेहरूंच्या काळात ग्रामोद्यागावर विशेष भर देऊन त्या संदर्भात. गावामध्ये 'सामुदायीक' विकास योजना ही सुरू केल्या गेल्या. त्यामुळे पुढील काळात गावाचा कायापालट होऊन गावाचे पुनरूत्यान झाले. तसेच काग्रेस अधिवेशामुळे शहरातील अनेक नेते व पुढारी गावात येऊ लागले त्याचबरोबर गावकरीही राष्ट्रीय कार्यात सहभाग घेऊ लागले यामुळे स्वातंत्र्य चळवळीचा बळकटी येऊन पुढील काळात राष्ट्रीय नेत्यांनी गावाशी नाळ जुडली व अनेकांनी गावात राहुन अनेक सुधारणा केल्या.

ग्राम स्वराज्य योजनेचा पुरस्कार महात्मा गांधीनी केल्यामुळे आर्थिक स्वावलंबनाही हातभार लावला व गावे स्वयंपूर्णतकडे वाटचाल करू लागली तसेच ग्रामोद्योगाच्या माध्यमातून गावातील बेकारी निवारण्याचा प्रयत्न झाल्यामुळे एकप्रकारे राष्ट्राच्या आत्मनिर्भरतेला हातभार लागला तसेच खादीचे महत्व वाढून पुढील काहात गावात व शहरात खादी मंडळे स्थापण झाली. व खादी कार्याला प्रोत्साहन मिळाले. तसेच खादीला प्रोत्साहन मिळण्यसाठी महात्मा गांधीनीही कांग्रेसच्या नेत्याला खादी वारण्याची सक्ती करून काही अटीही घालून दिल्या.[२५] त्यामुळे खादीचा प्रसार जोरात होऊन सर्वसामान्य लोकही खादी वापरू लागले. ग्रामोद्योगामुळे गावातील आर्थिक व सामाजीक जीवनाला मजबुती प्राप्त होऊन ग्रामोध्दाराचे कार्य सुरू झाले या दृष्टीने ग्रामोद्योगाचे कार्याने महात्मा गांधी खऱ्या अर्थाने 'ग्रामसुधारक व उद्धारक' ठरतात.

या ग्रामोधोणाच्या माध्यमातून गांधीजीनी कुटीर उद्योगाचाही जिर्णोध्दार करण्याचा प्रयत्न केला व त्यात ते बरेच यशस्वीही झाले. परंतु पुढील काळात वाढत्या यांत्रीकीकरणामुळे गावात उद्योगामध्ये यंत्राची वाढझाली त्यामुळे पुन्हा परावलबीत्व निर्माण झाले. गावे शहरात रूपांतरीत होऊ लागली व औद्योगीकरणाला चालना दिल्या गेली. पंडित नेहरूनीतर पुढे पंतप्रधान बनल्यानंतर औद्योगीरणाला चालना दिल्यामुळे महात्मा गांधीचा ग्रामोध्दाराचा प्रवाह बदलून गेला व त्याची जागा औद्योगीकरणाने घेतली असेच म्हणावे लागेल तरीही गावाची स्वयंपुर्णता परत मिळविण्यासाठी महात्मा गांधीने ग्रामोद्योगाच्या इथे केलेली कार्य हे नक्कीच क्रांतीकारी होते असेच म्हणावे लागेल.

संदर्भ ग्रंथ -

मराठी (प्राथमिक साधने)
(१) गांधीजी, 'हिंद-स्वराज्य', परंधान प्रकाशन पवनार, २००५.
(२) काळे गोपाळ(संपा) 'मराठी हरीजन', ७ जुलै १९४६.
(३) काळे गोपाळ(संपा) 'मराठी हरीजन', ४ आगस्ट १९४६.
(४) काळे गोपाळ(संपा) 'मराठी हरीजन', १७ नोव्हे. १९४६.
(५) ळंदकीप डंहंदसंस ;मक्क्ष्ए ध्लपरंदए ।नहनेज २९ए १९५३

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ((SJIF) -7.675, Issue NO, 247
ISSN : 2278-9308
October,2020

दुय्यम साधने -

(१) डॉ. कोठेकर व डॉ. वैद्य, 'आधुनिक भारताचा इतिहास', श्री साईनाथ खंड-२ प्रकाशन नागपूर, २००६

(२) गर्गे स.मा.(संपा), 'भारतीय समाजविज्ञान कोश खंड-२', मेहता पब्लीशर्स हाऊस, पुणे, २००७.

(३) गोखले द.न., 'गांधीजी-मानव नि महामानव', मौज प्रकाशन, मुंबई, १९९६

(४) जावडेकर शं.द., 'आधुनिक भारत', कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे, २००६.

(५) जोशी महादेव(संपा), 'भारतीय संस्कृती कोष खंड-५', भारतीय संस्कृतीकोष मंडळ प्रकाशन, पुणे, १९९६.

(६) पंडित नलिनी, 'गांधी', ग्रंथाली प्रकाशन', मुंबई, २००६.

हिंदी साधने -

(१) डॉ. इंदीरालक्ष्मी, 'महात्मा गांधी का दर्शन एव प्रमुख रचनात्मक कार्यक्रम', भारतीय विद्या शोध संस्थान, पटना,

(२) गुप्तविश्व प्रकाश व गुप्ता मोहिनी, 'भारत का स्वतंत्रता संग्राम राधा पब्लीकेषन्स, नई दिल्ली, २००७.

Assistant Professor

Scanned with OKEN Scanner